**दिनांक : २३/०८/२०१९**

**प्रेस नोट**

**<u>विषय</u>:-** पुणे पोलीसांना दि. २३ ऑगस्ट, २०१९ रोजी मिळालेल्या FICCI SMART Policing Award 2019 बाबत...

पुणे शहर पोलीसांना सन २०१९ या वर्षाकरिता फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्रीज (FICCI) या संस्थेच्या वतीने स्मार्ट पोलीसींगसाठी दोन पारितोषिके प्रदान करण्यात आली. पुणे पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस उप आयुक्त श्रीमती स्वप्ना गोरे यांनी श्री. जितेंद्र सिंग, मा. राज्यमंत्री, भारत सरकार यांचे हस्ते सदरचे बक्षिस / पारितोषिक स्विकारले. सदरचा कार्यक्रम हा अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेच्या अनुषंगाने, नवी दिल्ली येथे दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी FICCI आणि विवेकानंद इंटरनॅशनल फौन्डेशनचे वतीने आयोजित करण्यात आलेला होता.

फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्रीज (FICCI) या संस्थेचे वतीने अंतर्गत सुरक्षा व्यवस्था या विषयावर दरवर्षी या परिषदेचे आयोजन करण्यात येते, ज्यामध्ये भारत सरकारच्या वतीने वरिष्ठ अधिकारी, केंद्रीय सशस्त्र दले (CAPFs) व विविध राज्यांतील पोलीस दले (SPFs) यांची उपस्थिती असते. FICCI या संस्थेने भारतामध्ये स्मार्ट पोलीसिंग या उपक्रमामध्ये चांगली कामगिरी करणा-या घटकांना बक्षिस / पारितोषिक देण्यात येते. पोलिसांना भारतीय नागरिकांची सुरक्षितता आणि सुरक्षा वाढविणेकामी प्रोत्साहन देणे हा सदर उपक्रमाचा उद्देश आहे. विवेकानंद इंटरनॅशनल फौन्डेशन या संस्थेच्या विद्यमाने 'इनोव्हेशन लेड सायबर क्राईम मॅनेजमेंट' या विषयावर अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचा ११ व्या भागाचे / आवृत्तीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास विविध सुरक्षा दलांचे सुमारे १९५ पेक्षा अधिक घटक सहभागी झाले होते आणि आदरनीय ज्युरी मेंबर्स यांनी स्पेशल ज्युरी ॲवॉर्ड आणि स्मार्ट पोलीस ऑफिसर ॲवॉर्ड पुणे शहर पोलीस दलासाठी खालील दोन उपक्रमांसाठी जाहीर केले आहे.

१. Criminal Intensive Response Project (CRISP) –
२. Proactive Control on Women Trafficking and Red Light Area Crimes.

CRISP या उपक्रमाअंतर्गत आरोपींना रेग्युलर चेक करुन त्यांचे ठावठिकाणा व हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते. CRISP उपक्रम गुन्हे शाखेअंतर्गत राबविण्यात येत असून त्यामध्ये आतापर्यंत एकूण १०,५०० गुन्हेगार चेक करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. CRISP उपक्रमामुळे मागील वर्षाचे तुलनेत जबरी चोरी गुन्हयांमध्ये ४० टक्के घट, घरफोडी चोरी गुन्हयांमध्ये २० टक्के घट व वाहनचोरीचे गुन्हयांमध्ये १२ टक्केने घट झालेली आहे.

अनैतिक वेश्याव्यवसायावर सक्रिय नियंत्रण आणि अशा ठिकाणी घडणारी गुन्हेगारी (Proactive Control on Women Trafficking and Red Light Area Crimes) या अनुषंगाने अशा भागांमध्ये दिवसा-रात्री वेळोवेळी नाकाबंदीचे आयोजन करणे, अशा भागांतील बेकायदेशीर कारवायांवर लक्ष ठेवून प्रतिबंधक कारवाई करणे, अल्पवयीन मुलींची अनैतिक वाहतुक थांबविणे, नव्याने दाखल होणा-या मुलींना अनैतिक व्यवसायातून परावृत्त करणे, अनैतिक व्यवसायामध्ये सक्रिय असलेल्या महिलांची माहिती काढून त्यांचे वय, धर्म, अनैतिक व्यवसायात दाखल झाल्याचा कालावधी याबाबत माहिती ठेवणे. अनैतिक व्यवसायातील महिलांचे पुनर्वसन करणे अशा उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यामुळे रेड लाईट एरियामधील गुन्हेगारी कमी होण्यास मदत झालेली आहे.

